पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा. क्रीडा,कला,साहित्य व सांस्कृतिक समिती

कार्यपत्रिका क्रमांक – **२०**

**सभावृत्तांत**

दिनांक - **१५/०७/२०१५** वेळ - दुपारी **२.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.क्रीडा,कला,साहित्य व सांस्कृतिक समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक **१५/०७/२०१५** रोजी दुपारी **२.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१)** मा. तानाजी विठ्ठल खाडे
**२)** मा. मोटे किरण बाळासाहेब
**३)** मा. सुपे आशा रविंद्र
**४)** मा. सौ.साळुंके सविता सुरेश
**५)** मा. गिता सुशिल मंचरकर
**६)** मा. म्हेत्रे सुरेश रंगनाथ
**७)** मा. बारणे निलेश हिरामण

या शिवाय मा.फुंदे – सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप – नगरसचिव, मा.तुपे – सह शहर अभियंता, मा.कडूसकर – सहा.आयुक्त, मा.कांबळे – कार्यकारी अभियंता, मा.इंदलकर – कामगार कल्याण अधिकारी, मा.बैंडे – प्रशासन अधिकारी, मा.पानसरे – क्रीडा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

खालीलप्रमाणे सुचना मांडणेत आली.

सुचक – मा.किरण मोटे अनुमोदक – मा.सुरेश म्हेत्रे

सभा कामकाज सुरु करणेचे वेळी मा.सभापती ननवरे जितेंद्र बाबा सभागृहात उपस्थित नसलेने सभेचे अध्यक्षस्थानी मा.तानाजी खाडे यांची निवड करणेत यावी.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

----------

( मा.तानाजी खाडे यांनी सभेचे अध्यक्षस्थान स्विकारले )

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.३) मनपाचे संभाजीनगर येथील व्यायामशाळेकरिता व्यायामशाळा साहित्य खरेदीस कार्योत्तर मान्यता देणेबाबत –

विषय क्र.४) मनपाचे संभाजीनगर येथील व्यायामशाळेकरिता व्यायामशाळा साहित्य खरेदीस कार्योत्तर मान्यता देणेबाबत –

विषय क्र.५) पिंपळे निलख येथील व्यायामशाळा जिम चालविण्यास मिळणेबाबत – मा.गिता मंचरकर, मा.आशा सुपे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.६) सांस्कृतिक आणि कला धोरणात्मक विविध कार्यक्रमांचे आयोजनाबाबत – मा.निलेश बारणे, मा.आशा सुपे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.७) महापौर चषक शूटींग बॉल स्पर्धेचे आयोजनाबाबत – मा.किरण मोटे, मा.निलेश बारणे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.८) से.२२ झेड क्लस्टर राहुलनगर हॉल निगडी येथे कॅरम साहित्य खरेदी करणेस मान्यता देणेबाबत – मा.सुरेश म्हेत्रे, मा.सविता साळुंके यांचा प्रस्ताव.

----------

खालील प्रमाणे सुचना मांडणेत आली.

सुचक – मा.सविता साळुंके                                        अनुमोदक – मा.गिता मंचरकर

मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीची दि.१५/०७/२०१५ ची सभा शुक्रवार दि.१७/०७/२०१५ रोजी दुपारी २.०० वा.पर्यंत तहकूब करणेत यावी.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

----------

**सभाध्यक्ष -** शुक्रवार दि.१७/०७/२०१५ रोजी दुपारी २.०० वा.पर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.

**( तानाजी विठ्ठल खाडे )**
**सभाध्यक्ष**
क्रीडा,कला,साहित्य व सांस्कृतिक समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.
मा. क्रीडा,कला,साहित्य व सांस्कृतिक समिती
कार्यपत्रिका क्रमांक – **२०**

**सभावृत्तांत**

( दिनांक १५/०७/२०१५ ची तहकूब सभा )

दिनांक - **१७/०७/२०१५** वेळ - दुपारी **२.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.क्रीडा,कला,साहित्य व सांस्कृतिक समितीची दि.१५/०७/२०१५ ची तहकूब सभा शुक्रवार दिनांक **१७/०७/२०१५** रोजी दुपारी **२.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१)** मा. तानाजी विठ्ठल खाडे
**२)** मा. सौ.साळुंके सविता सुरेश
**३)** मा. गिता सुशिल मंचरकर
**४)** मा. म्हेत्रे सुरेश रंगनाथ

या शिवाय मा.फुंदे – सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप – नगरसचिव, मा.कडूसकर – सहा.आयुक्त, मा.इंदलकर – कामगार कल्याण अधिकारी, मा.बेंडे – प्रशासन अधिकारी, मा.मुंढे – सहा.प्रशासन अधिकारी, मा.पानसरे – क्रीडा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

खालीलप्रमाणे सुचना मांडणेत आली.

सुचक – मा.तानाजी खाडे अनुमोदक – मा.सुरेश म्हेत्रे

सभा कामकाज सुरु करणेचे वेळी मा.सभापती ननवरे जितेंद्र बाबा सभागृहात उपस्थित नसलेने सभेचे अध्यक्षस्थानी **मा.सविता साळुंके** यांची निवड करणेत यावी.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

----------

( मा.सविता साळुंके यांनी सभेचे अध्यक्षस्थान स्विकारले )

----------

ठराव क्रमांक – ११२ विषय क्रमांक - १

दिनांक - १७/०७/२०१५ विभाग - क्रीडा

सुचक – मा.सुरेश म्हेत्रे अनुमोदक – मा.गिता मंचरकर

संदर्भ - मा.अति.आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/९/कावि/६३/२०१५, दि.२४/०६/२०१५

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

क्रीडा विभागाचे कामकाजासाठी २०० मी. नायलॉन होज पाईप कोटेशन मागवुन करारनामा न करता मे.मेट्रो इंडस्ट्रीयल प्रोडक्टस्, भोसरी यांचेकडून र.रु.९,७७८/- (अक्षरी र.रु.नऊ हजार सातशे अठ्याहत्तर फक्त) खरेदी करणेत आलेला असलेने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ११३ विषय क्रमांक - २

दिनांक - १७/०७/२०१५ विभाग - क्रीडा

सुचक – मा.तानाजी खाडे अनुमोदक – मा.सुरेश म्हेत्रे

संदर्भ - मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/७अ/कावि/४९८/२०१५, दि.२९/०६/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाचे क्रीडा विभागाकडील ई-निविदा नोटीस क्र.१/२-२०१३-२०१४ थेरगांव जलतरण तलाव पाणी शुध्दीकरण, परिसर स्वच्छता, साफसफाई, देखभाल व यांत्रिक देखभाल दुरुस्ती कामासाठी प्राप्त झालेले फर्स्ट लोएस्ट ठेकेदाराचे संत गाडगेबाबा महाराज स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था मर्यादित, पिंपरी यांचे २ वर्षाचे लघुत्तम दरानूसार १ ल्या वर्षाचा दरमहा दर र.रु.१,०८,९००/- या दराने १२ महिने कामासाठी येणारा खर्च र.रु.१३,०६,८००/- तसेच दुस-या वर्षाचा दरमहा दर र.रु.१,१९,७९०/- या दराने १२ महिने कामासाठी येणारा खर्च रक्कम रुपये १४,३७,४८०/- एकूण र.रु.२७,४४,२८०/- (अक्षरी र.रु.सत्तावीस लाख चव्वेचाळीस हजार दोनशे ऐंशी फक्त) चे कामकाज सेकंड लोएस्ट ठेकेदार मे.वरदायिनी एन्टरप्राईजेस, चिंचवड, पुणे ३३ यांचेकडून करारनामा करुन २ वर्षाचे कामाचे आदेश देणेकामी येणा-या खर्चास मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक – ११४ विषय क्रमांक - ३
दिनांक - १७/०७/२०१५ विभाग - क्रीडा
सुचक – मा.सुरेश म्हेत्रे अनुमोदक – मा.गिता मंचरकर
संदर्भ - मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/०९/कावि/६८/२०१५, दि.०२/०७/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाचे संभाजीनगर येथील व्यायामशाळेचे नुतनीकरण झालेने परिसरातील नागरिकांसाठी व्यायामाची आवड निर्माण होण्यासाठी व्यायामशाळा साहित्य खरेदीकामी कोटेशन नोटीस प्रसिध्द करुन, दरपत्रक मागवून करारनामा न करता मे.आदित्य स्पोर्टस्, आकुर्डी, पुणे ३५ यांचेकडून एकूण र.रु.१,९३,९०९/- ( अक्षरी र.रु.एक लाख त्र्यान्नव हजार नऊशे नऊ फक्त) इतक्या रकमेचे व्यायाम साहित्य खरेदी केले असून सदरचे खर्चास कार्योत्तर मान्यता घेणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ११५ विषय क्रमांक - ४
दिनांक - १७/०७/२०१५ विभाग - क्रीडा
सुचक – मा.सुरेश म्हेत्रे अनुमोदक – मा.गिता मंचरकर
संदर्भ - मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/०९/कावि/६९/२०१५, दि.०२/०७/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाचे संभाजीनगर येथील व्यायामशाळेचे नुतनीकरण झालेने परिसरातील नागरिकांसाठी व्यायामाची आवड निर्माण होण्यासाठी व्यायामशाळा साहित्य खरेदीकामी कोटेशन नोटीस प्रसिध्द करुन, दरपत्रक मागवून करारनामा न करता मे.आदित्य स्पोर्टस्, आकुर्डी, पुणे ३५ यांचेकडून एकूण र.रु.१,९३,८५६/- ( अक्षरी र.रु.एक लाख त्र्यान्नव हजार आठशे छप्पन्न फक्त) इतक्या रकमेचे व्यायाम साहित्य खरेदी केले असून सदरचे खर्चास कार्योत्तर मान्यता घेणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ११६ विषय क्रमांक - ५

दिनांक - १७/०७/२०१५

सुचक – मा.गिता मंचरकर अनुमोदक – मा.तानाजी खाडे

संदर्भ – मा.गिता मंचरकर, मा.आशा सुपे यांचा प्रस्ताव.

पिंपळे निलख येथील प्रभाग क्र.५४ मधील भांडे इमारतीमधील व्यायामशाळा अनेक दिवसांपासून बंद स्थितीत आहे. तरी नवयुग मित्र मंडळ ( श्री.कुणाल सुर्वे ) या संस्थेस देखभाल संरक्षण चालन कामी देण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ११७ विषय क्रमांक - ६

दिनांक - १७/०७/२०१५

सुचक – मा.तानाजी खाडे अनुमोदक – मा.गिता मंचरकर

संदर्भ – मा.निलेश बारणे, मा.आशा सुपे यांचा प्रस्ताव.

सांस्कृतिक आणि कलाधोरणांतर्गत विविध कार्यक्रम आयोजनाबाबत –

| अ.क्र. | महिना | कार्यक्रम | कालावधी | खर्च |
|---|---|---|---|---|
| ०१ | जुलै २०१५ | नृत्यावर अधारीत कार्यक्रम | १ दिवस | १.०० लक्ष |
| ०२ | ऑगष्ट २०१५ | सुगम संगीत स्पर्धा, सुगम संगीत गायन कार्यक्रम या कार्यक्रमात स्पर्धेतील विजेत्या कलावंतांचा सहभाग राहील. | २ दिवस | १.५० लक्ष |
| ०३ | ऑगष्ट २०१५ | आदिवासी महोत्सव | १ दिवस | ५.०० लक्ष |
| ०४ | सप्टेंबर २०१५ | भारतातील विविध राज्यातील लोककला, नृत्य गायन व वादनावर आधारीत परंपरा महोत्सव लोककला महोत्सव. | ३ दिवस | २.५० लक्ष |
| ०५ | नोव्हेंबर २०१५ | अ) नाटय अभिनय कार्यशाळा<br>ब) नाटय एकांकिका स्पर्धा<br>क) विजेत्या एकांकिकेचा कार्यक्रम. | ४ दिवस | २.०० लक्ष |
| ०६. | डिसेंबर २०१५ | अ) कवी संमेलन<br>ब) वक्तृत्व स्पर्धा<br>क) निबंध स्पर्धा | ३ दिवस | १.५० लक्ष |
| ०७ | जानेवारी २०१६ | आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव | ५ दिवस | अंदाजपत्रकीय तरतूदीप्रमाणे |
| ०८ | जानेवारी २०१६ | स्वरसागर संगीत महोत्सव | ४ दिवस | अंदाजपत्रकीय तरतूदीप्रमाणे |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ०९ | फेब्रुवारी २०१६ | चित्रकला/ शिल्पकला / हस्तकला प्रदर्शन | ३ दिवस | २.०० लक्ष |
| १० | फेब्रुवारी २०१६ | राष्ट्रप्रेम आणि राष्ट्रीय एकात्मता या विषयावर आधारीत<br>अ) परीसंवाद<br>आ) मुलाखत | ३ दिवस | १.०० लक्ष |
| ११ | मार्च २०१६ | महिला महोत्सव – रांगोळी, मेहंदी, पाककला, वेशभूषा स्पर्धा | १ दिवस | २.५० लक्ष |

उपरोक्त प्रमाणे सांस्कृतिक आणि कलाधोरणांतर्गत विविध कार्यक्रम आयोजनास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ११८ विषय क्रमांक - ७

दिनांक - १७/०७/२०१५

सुचक – मा.सुरेश म्हेत्रे अनुमोदक – मा.तानाजी खाडे

संदर्भ – मा.किरण मोटे, मा.निलेश बारणे यांचा प्रस्ताव.

जानेवारी २०१६ मध्ये “ गजानन म्हेत्रे उद्यान व मैदान, म्हेत्रेवाडी – कृष्णानगर ” येथे **“ महापौर चषक शुटींग बॉल ”** स्पर्धेचे आयोजन करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ११९ विषय क्रमांक - ८

दिनांक - १७/०७/२०१५

सुचक – मा.सुरेश म्हेत्रे अनुमोदक – मा.तानाजी खाडे

संदर्भ – मा.सुरेश म्हेत्रे, मा.सविता साळुंके यांचा प्रस्ताव.

से.२२ झेड क्लस्टर हॉल, राहुलनगर, निगडी येथे ३ कॅरम व त्या अनुषंगाने साहित्य खरेदी करणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

( **सौ.साळुंके सविता सुरेश** )
**सभाध्यक्षा**
क्रीडा,कला,साहित्य व सांस्कृतिक समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/ ५५०/२०१५
दिनांक : २१/०७/२०१५



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

\\172.16.0.152\e\e drive\Nagersachiv1\Krida-14-15\proceeding1_Krida 20.doc